आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol. I, Issue- LXXIV, Nov. 2022

- Cheif Editor -
Mrs. Pallavi Laxman Shete

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

# Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. S.V. Shivanikar**<br>Principal<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Deepak Dwarkadasrao Bachewar**<br>Associate Professor<br>Vasantrao Naik College, Vasarni, Nanded- (MH., India.) |
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics, Pratibha Niketan Mahavidyalaya, Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies<br>S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr.Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine,<br>Dept. of Cancer Biology,Winston Salem, NC, USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor,Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit, HNB Garhwal University,<br>Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>.Sardar Vallabhbhai Patel Hospital,(Neurosurgery),Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci.<br>S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |

# Co-Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science<br>Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages,<br>Loyola College,(Autonomous) Affiliated to University of Madras,Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry<br>Shivaji University, Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension Education, Institute of Agricultural Sci.<br>BHU, Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English, Dr. B.R. Ambedkar F.G. College, Ladgeri,<br>Bidar, Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce<br>(MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education<br>S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa<br>Govt. Ayurved College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD, Dept. of Rachanasharir,<br>Shri dhanwantry ayurvedic College and hospital<br>sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College, Nanded. (MH., India) |

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | CONTRIBUTION OF BRETHREN MISSIONARY TOWARDS LEPROSY TREATMENTS AND UPLIFTMENT | Anand Jonathan Kanchan | 01 |
| 02. | PERCEPTION OF CONSUMERS OF UJJAIN CITY USING ONLINE SHOPPING APPLICATION- MEESHO:A STUDY | CHETALI VED<br>Dr. Keshav Mani Sharma | 12 |
| 03. | RUSKIN BOND'S SEARCH FOR AN ANGLO-INDIAN SELF IN HIS WRITINGS | Miss. Zarreen Naz Mohammed Iqbal<br>Dr. Umesh Gulabrao Patil | 20 |
| 04. | THE GHARANA SYSTEM IN INDIAN CLASSICAL MUSIC | Dr. Pravin Radhakrishna Alshi | 24 |
| 05. | DEPICTION OF PARTITION IN BHISHAM SAHANI'S TAMAS | Tryambak Ganeshrao Bobade | 39 |
| 06. | WOMEN ENTREPRENEURSHIP: CHALLENGES FOR HOMEPRENEURS / MOMPRENEURS | Mukta R. Agrawal<br>Dr. Jyoti H.Lahoti | 43 |
| 07. | PMJDY-A STUDY OF ITS ROLE IN FINANCIAL INCLUSION AND INCLUSIVE GROWTH IN INDIA | Dr. Mansoor Khan<br>Anju Jain | 51 |
| 08. | WOMEN EMPOWERMENT THROUGH ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT IN MAVAL AND MULSHI BLOCKS OF PUNE DISTRICT | Lalita Ketan Bhosale<br>Prof. Dr. Sulbha N. Patole | 56 |
| 09. | MODERN APPROACHES OF TEACHING AND LEARNING ENGLISH AS A SECOND LANGUAGE | Rubeena Abdus Sattar | 61 |
| 10. | A STUDY OF IMPACT OF SCHOOL ENVIRONMENT ON THE PERSONALITY OF THE STUDENTS OF RURAL AND URBAN GOVT. HIGH SCHOOLS | Dr. Kirtibala Verma | 66 |
| 11. | MEDICAL FACILITIES IN MARATHWADA AND THEIR UTILIZATION | Ghanghav Vijay Ramnath | 70 |
| 12. | SCREENING OF AEROBIC CELLULOLYTIC BACTERIA FROM THE GUT OF TERMITE FOR CELLULASE PRODUCTION. | Surekha Digambar Bharambe<br>Kunvar Gyanendra Kumar<br>Vikas shukre | 75 |
| 13. | ROLE OF ACADEMIC LIBRARIES IN KNOWLEDGE SOCIETY | Prof. Tikaram D. Samrit | 79 |
| 14. | ISSUES OF GENDER DISPARITY AND WOMEN'S EMPOWERMENT IN INDIA | Gurpinder Kumar<br>Aastha Dixit | 82 |

| | | | |
|---|---|---|---|
| 15. | FOOD AND AGRICULTURAL ORGANIZATION VIS-À-VIS INTERNATIONAL EFFORTS TO DEFEAT HUNGER | Dr. Sourabh V. C. Ubale | 88 |
| 16. | LAB GROWN BIOLOGICAL TEXTILES: FASHION TRENDS FOR FUTURE CLOTHING | Ambica Khurana | 99 |
| 17. | INNOVATIVENESS STATUS OF WOMEN ENTERPRENEURS IN HASSAN DISTRICT | Dr. Ramesha V | 102 |
| 18. | HUMAN RESOURCE MANAGEMENT PRACTICES AND JOB SATISFACTION: EVIDENCE FROM INDIAN BANKING SECTOR | Dr. Savitha | 106 |
| 19. | "AN ASCENDANCY OF CULTURAL VARIANCES ON THE INTERPRETATION OF ENGLISH & AMERICAN LITERATURE" | SHRUTHI. T | 111 |
| 20. | "A SCRUTINY ON GLOBALIZATION AND SOCIAL CHANGE" | REKHA T.C | 115 |
| 21. | A POSTULATION OF SECULARISM AND THE CONSTITUTION OFINDIA | Dr. Bharati. A. Hosatti | 119 |
| 22. | "EVALUATION OF BIOEFFICACY OF JUSTICIA ADHATODA L." ON MYCELIAL GROWTH OF COLLETOTRICHUM CAPSICI. | Dhole A. C | 123 |
| 23. | भूमंडलीकरण और हिन्दी साहित्य | Prof. Mahaboob Subani | 125 |
| 24. | जयशंकर प्रसाद का स्त्री विमर्श | डॉ. पुष्पा गोविंद गायकवाड | 128 |
| 25. | क्रांतिकारी संत महात्मा बसवेश्वर | डॉ. विठ्ठल केदारी | 133 |
| 26. | ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अंबरनाथ शिवमंदिर | प्रा. डॉ. किशोर कोंड्बाजी काजळे | 136 |
| 27. | संपत्तीवर मालकी हक्क आणि महिला | रेणुका कड<br>डॉ. अविनाश गोरे | 142 |
| 28. | आद्यक्रांतीकारक उमाजी नाईक | प्रा. शिवचरण धांडे | 145 |
| 29. | ब्रिटिश शासनकाळातील मुंबईमधील बाजाराचा विकास | रामप्रसाद मोहनराव व्हडगीर | 148 |
| 30. | 'स्त्री भ्रुणहत्या' एक सामाजीक समस्या | डॉ. उल्हास रामजी राठोड | 153 |
| 31. | वृध्दांचे कायदेशीर अधिकार आणि हक्क बाबत त्यांना असलेल्या जाणिवांचा अभ्यास : | डॉ. अविनाश गोरे<br>नंदुराम अभानराव गायकवाड | 158 |

| | | | |
|---|---|---|---|
| 32. | स्त्रियांच्या विकासासाठी रमाबाई रानडे यांच्या कार्याचा आढावा | डॉ. संजय बिरंगणे | 167 |
| 33. | भारताची संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता- एक अभ्यास | डॉ. सोनवणे जी. एन. | 171 |
| 34. | भारतीय शेती व ग्रामीण विकासावर झालेले जागतिकीकरणाचे परिणाम | डॉ. सुलभा गुलाबराव वानखेडे | 175 |
| 35. | मुलांमधील मानसिक ताण व त्यावरील उपाय योजना | प्रा. डॉ. रवि मगन सुरवसे | 180 |
| 36. | आदिवासी कवितेचा उगम आणि विकास | कोंडाबाई काशीनाथ दांडेगावकर | 183 |
| 37. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार : एक दृष्टीक्षेप | सुर्यवंशी राम उद्धवराव | 186 |
| 38. | भांडवली बाजारातील दीर्घकालीन गुंतवणुकीचे विश्लेषण | डॉ. दत्ता कोंडबाराव मगर | 190 |
| 39 | मराठी आदिवासी कविता : स्वरुप आणि वेगळेपण | सखुबाई महादू मारकळ | 193 |
| 40. | महात्मा फुले यांचे शेतीविषयक सुधारणावादी विचार | डॉ. शिवराज काचे | 196 |
| 41. | 'महाराष्ट्रातील बालकामगाराची व्याप्ती' | डॉ. विलास कचरू रंदील | 200 |
| 42. | श्री तुकाराम महाराजांच्या गाथेतील दृष्टांत योजना | प्रा. डॉ. नाथराव ज्ञानोबा गरजाळे | 203 |
| 43. | उखाण्यातून व्यक्त होणारे साहित्याचे सौंदर्य | प्रा. विजय डी. झुंजारराव | 208 |

# महात्मा फुले यांचे शेतीविषयक सुधारणावादी विचार

डॉ. शिवराज काचे

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**प्रस्तावना :**

महात्मा जोतिराव फुले हे भारतीय समाज क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात. समाजहिताचे विचार पत्यक्षात आणणारे ते बंडखोर युग पुरूपु होते. ते त्याच्या विचारांचा व सामाजिक कार्याचा प्रभाव भारतीय जनसामाण्यांच्या जीवनावर पडलेला दिसून येतो. त्यांचे जीवन व कार्य हे प्रस्थापित विरूद्ध विस्थापित, प्रतिष्ठीत विरूद्ध अप्रतिष्ठीत शोषक विरूद्ध शोषित यांच्या न्याय हक्काच्या लढ्यासाठी केलेला संघर्ष होता. कोणत्याही शसनसत्तेचा व पुरेपुरेशा प्रमाणातील अर्थिक पाठबळाचा आधार नसताना ते जे करू शकले त्याला भारतीय समाजक्रांतीच्या इतिहासात तोड नाही. तत्कालीन समाजव्यवस्थेतील सयस्येवर त्यांनी चिंतन केले आहे. त्यापैकीच एक शेती होय. शेती करणारा वर्ग हा तत्कालीन बुरसटलेल्या विचारांनी देशोधडीस चालला आहे. याचे चिंतन आणि त्याविषयी सुधारणावादी विचार त्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' (1983) या ग्रंथात मांडला आहे. शेतकऱ्यांच्या अन्यायाविरूद्ध बंड करणारे ते पहिले भारतीय समाजसुधारक होते. ते त्यांच्या शेतीविषयक चिंतनाचा कालावधी हा पेशवाईचा उत्तरार्ध आणि ब्रिटीश सत्तेचा पूर्वाध हा होता. त्या कालखंडातील शेतकऱ्यांच्या दयनिय स्थितीचे कारणे आणि स्थिती सुधारणेविषयी उपाय योजना सांगीतल्या आहेत. त्या आजच्या काळातही खुप महत्वाच्या ठरतात. महात्मा फुले यांच्या मते शेती ही अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तर शेतीवर राबणारा शेतकरी व शेतमजूर हा समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. त्यांच्या श्रमातून उत्पादीत होणाऱ्या वस्तूवरच तू समाजातील व्यवहार चालतात. पण त्यांच्या पदरात शेवटी दारिद्रयच शिल्लक राहतं. त्याचे प्रमुख कारण म्हणजे तत्कालीन समाजव्यवस्थेत शेतकऱ्याला मिळालेला निम्न दर्जा होय. भारतीय समाजव्यवस्थेत उतरंड तयार झालेली असून शेतकऱ्याला शुद्र समजले आहे. त्याचे अमाप अर्थिक शोषण झालेले आहे. त्यामुळे शेतकरी अधिकच दारिद्र्यात जगू लागला. शेतकऱ्यांच्या या दयनिय स्थितीविषयी वर्णन करताना महात्मा फुले म्हणतात.

**कायापूर्ती लंगोटी | फिरती नांगराच्या पाटी |**
**ताक कण्या पोटभरी | धन्य म्हणे संसारी |**

तत्कालीन कालखंडापासून आजपर्यंत शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. बदलत्या निसर्गचक्रामुळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ आहे. एवढेच नाहीतर सावकाराची कर्जवसूली, जपत्या, नोकरशाहीचा भ्रष्टाचार आणि अनिश्चित बाजारभाव यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होत असल्यामुळे आजही शेतकरी दारिद्र्यातच जीवन कंठत आहे. या अशा दारिद्र्याला आणि शोषणाला कंटाळून शेतकरी आतमहत्या करत आहेत.

एकशेचाळीस वर्षापूर्वी मांडलेले विचार अमलात आले असते तर शेतकऱ्यांची आणि शेतीची ही दयनीय अवस्था झाली नसती. आजही शासनकर्ती जमात शेतकऱ्यांच्या आणि शेती च्या प्रश्नांकडे गांभीर्याने पहात नाही . फक्त मताचा विचार करून निवडणुकीच्या काळात शेतकऱ्याचा पुळका येतो. त्यांचे भांडवल करून दुष्काळात, संकटकाळी एसीच्या गाडीतून दौरे करतात. अल्पमदत देवून शेतकऱ्यांच्य तोंडाला पाणी पुसतात. अशा या स्वार्थी

व्यवस्थेकडे शेतकऱ्यांच्या आयुष्ययातील शुक्लकाष्ट संपत नाही. यामुळेच जगातील शेतकऱ्यांचा विचार करता भारतीय शेतकऱ्यांची स्थिती किती वाईट आहे. याविषयी महात्मा फुले म्हणतात, "जगातील एकंदर सर्व देशाचे इतिहास एकमेकांशी ताडून पहाता, हिंदुस्थानातील अज्ञानी व देवभोळया शुद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशातील शेतकऱ्यापेक्षा निकृष्ठ अवस्थेस पात्र होवून केवळ पशूपशू लीकडचे मजलशीस जावून पोहचली असे दिसून येईल". महात्मा फुले यांचे सुक्ष्मनिरीक्षण, चिंतन आणि शेतकऱ्याची स्थिती या विषयी त्यांची तळमळ लक्षात येते. ते मानवतेविषयची व्यापक दृष्टी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' आणि अन्य ग्रंथातून ही दिसून येतो. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात महात्मा फुले यांनी तळमळीने आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या या विचारांना वास्तवा ची बैठक आहे. स्वतः त्यांनी ती पाहिली आहे. कित्येक वर्षांपासून शेतीची आणि शेतकऱ्यांची दैन्यावस्था चालू होती. त्यांच्या दुःखाला कोणीही वाचा फोडली नव्हती . स्थिर असलेल्या पेशवे राजवटीच्या काळातही शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल झालेला नव्हता. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याय व जुलमाविषयी म्हणतात की, "आर्य पेशवे याचे राजवटीत कुलदीपक पुरूपु रावबाजीचे कारकिर्दीचा अस्त होईतो पर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले तर त्यास उन्हामध्ये ओणवे करून पाठीवर एक मोठा दगड द्यावा, अथवा त्या शेतकऱ्यांच्या बायकोस त्याच्या पाठीवर बसवावे आणि खालून त्यास मिरच्याचा धुर द्याव, तात्पर्य, त्यावेळेस प्रजेस दुःख देण्याच्या कामात जी कांही सुधारणूक झाली होती अन्य देशातील प्रत्योच्या दुःखाशी तुलना करून पाहिली असता, हटकून पहिले बक्षीस हिजला मिळावयाचे" शेतकऱ्यांच्या या परिस्थितीस, त्यांच्या हालीखीच्या जगण्यात सुधारणा व्हावी असा त्यामागे उद्देश होता. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या पूर्वीच्या स्थितीत त्यांचे होणारे शोषण, नागविला जणारा शेतकरी, त्याची होणारी लुबाडणूक शेतकऱ्यांचे असणारे अज्ञान, अंधश्रद्धा, त्यांच्या कुटुंबावर होणारा याचा परिणाम, या सर्व समस्येवरील उपाय यावर चिंतन प्रकट केले आहे. महात्मा फुले यांच्या शेतकरी व शेती विषयक विचाराचे एक महत्वाचे वैशिष्ठ्यं म्हणजे त्यांनी केलेला अर्थिक शोषणाचा मुलगामी विचार होय. पारंपारिक समाजव्यवस्थेतील जातीभेदाचे दुष्परिणाम या सोबतच आर्थिक शोषण ही त्यांना महत्वाचे वाटते. ते अपणास पढील उताऱ्यातून दिसून येईल.

"…..सांप्रत लक्ष्मी आपल्या ज्ञान व वस्त्रहीन झालेल्या शेतकऱ्यांच्या घरात पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेना, तेव्हा कंटाळून उघड दिवसा आपल्या समुद्रपित्याचे घरा गेली व समुद्राचे पलिकडील तिच्या इंग्रज सख्या बांधवांनी तिच्या मर्जीप्रमाणे आळस टकून उद्योगधंद्यचा पाठलाग करून आमच्या घरातील अबालवृद्ध, स्त्री जातीस बरोबरीचा मान देवून त्यांचा इतमान नीट ठेवू लागल्यामुळे ती त्यांची बंदी बटीक झाल्यावरून, त्याच बरोबर वरकांती गोड गोड बोलतात खरे, परंतू त्यास मनापासून विद्या देण्यास चुक चुवा चुक करितात. त्याचे मुख्मु कारण हेच असावे की शेतकरी विद्वान झाल्याबरोबर ते आपल्या खांद्यावर असूड टाकून लक्ष्मीस पुडेपुढे घालून आपल्या घरी नांदावयास लावण्याकरीता कधी मागंपुढे पहाणार नाहीत. त्या भयास्तवते शेतकऱ्यास विद्वान करीत नाहीत." पारंपारीक समाजव्यवस्थेत भट ब्राम्हणांनी चार्तूवर्ण्य व्यवस्थेतील समाजास जसे शिक्षणापासून वंचित ठेवले. तसेच इंग्रज प्रशासनाने ही वंचित ठवले आहे. समाज सुधारणेसाठी बहुजनांना शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांनाही शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय समाजसुधारणेला तरणोपाय नाही हा सुधारणाविषयक विचार अत्यंत समर्पकपणे विशद करतात. त्याकाळातील शेतकऱ्यांची स्थिती महात्मा फुले यांनी जवळून पाहिली होती. शेतकऱ्यांच्या या हालाखीच्या स्थितीचे, त्या मागील कारणांचे महात्मा फुले यांनी सखो चिंतन केले. या

चिंतनातून शेतकऱ्याविषयी, शेतीविषयी त्यांच्या शोषणाचे, त्या शोषणामागील कारणाचा विचार त्यांच्या लेखनातून येतो. या शोषित व्यवस्थेतून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारायची असेल तर त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे ही जाणीव त्यांना झाली होती. महात्मा फुले यांच्या वरील विवेचनावरून त्यांचे निरीक्षण किती सुक्ष्म होते याचा प्रत्यय येतो. शेती आणि शेतकरी याविषयी इतका मुलगामी विचार करणारा समाजसुधारक महात्मा फुले यांच्याशिवाय त्या काळात कोणीही केला नव्हाता असे म्हणतात येईल. महात्मा फुले यांनी शेती आणि शेतकरी याविषयी सखोल चिंतन केलेले असल्याने त्यावरील उपाययोजनाही त्यांनी सुचवलेल्या आहेत. त्यात तत्कालीन शासन व्यवस्था असलेल्या इंग्रज सरकारला या संदर्भात काय करता येईल, हे सुचवताना त्यांनी शेतकऱ्यांच्या कामात, शेतीच्या उपाययोजनेत भटब्राम्हणांना कोणतेही ते स्थान देवू नये असे सांगितले. शेतीच्या विकासाठी विविध योजनांचा भर असावा,

तसेच शेतकऱ्यांची नैतिकताही विचारात घ्यावी असे त्यांना वाटते. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनातील सुधारणेबरोबरच त्यांची शेती ही सुधारली पाहिजे असा चौफेर दृष्टीकोन महात्मा फुले यांचा होता. शेतीचा विकास होण्यासाठी शेतकऱ्याला आधुनिक ज्ञान मिळाले पाहिजे. शेतकऱ्याजवळ असलेल्या गुरांना चरण्यासाठी मोकळी जंगले उपलब्ध करून दिली पाहिजेत. वाहत्या पाण्याला अडवून बंधारे घातले पाहिजेत. ह्या विचार आज शासन आमलात आणत आहे. "पाणी आडवा पाणी जीरवा" म्हणजेच महात्मा फुले यांचा विचार किती दुरदुगामी होता. याचे प्रत्यंतर येते. ते त्यांच्या या विरावरून शेती विज्ञाननिष्ठ असावी अशी धारणा होती. महात्मा फुले यांनी शेतीचा आणि शेतकऱ्यांचा सर्वांगीन विकास घडवून आणण्यासाठी खुप महत्वाच्या उपाययोजना केल्या आहेत. त्यात टेकड्यावर तलाव बांधावे, नद्यावर धरणे बांधावीत हाडे, राख, शेण वाहून जाऊ नये यासाठीची उपाययोजना करावी. जेणेकरून सेंद्रीय खत जमीनीला मिळेल. नदीचे पाणी विहिरीत साठवून ते फळबागासाठी आणि शेतीसाठी उपयोगात आणावे. जमीनीची धुप होवू नये यासाठी उपाय योजावेत. शेतकऱ्याला विहिर खोदण्यासाठी शासनाने अर्थिक मदत करावी. जमिनिची सुपीकता वाढवण्यासाठी तलाव, विहिर, नदी यातला गाळ शासनाने काढून द्यावा. वृक्षाची जोपासना करावी. शेळयांच्या लेंड्या शेतीच्या खतासाठी उपयोगात आणाव्यात. शेतकऱ्यासाठी शेती प्रदर्शने भरवावीत.

शेतकऱ्याकडून जो शेतसारा जमा केला जातो त्याचा उपयोग त्यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी व्हावा. अधुनिक पद्धतीचे अवजारे वापरावीत. खाजगी सावकारीच्या तावडीतून शेतकऱ्यांना सोडवण्यासाठी शासनाने कायदा करावा. असे अनेकविध उपाययोजना महात्मा फुले यांनी सुचविल्या होत्या. याचा प्रत्यय आजही येतो आहे.

**सारांश :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था शेती वर अवलंबून आहे. तरीही भारतीय शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनिय आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे पुर्वपर्वरंपरेपासून सुरू असलेली ब्राम्हणभटशाही होय. या परंपरेत शेतकऱ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. यातून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणो पाय नाही. ही बाब ओळखून महात्मा फुले यांनी शिक्षणाचा आग्रह केला. त्यामुळे शासनकर्त्यांने शेतकऱ्यांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी, शेतकऱ्यासाठी परदेशी सहली आयोजित कराव्यात जेनेकरून शेतकऱ्यांना चौफेर ज्ञान मिळेल. अशा अनेक उपाय-योजनासह महात्मा फुले यांनी शेती आणि शेतकरी

सुधारणेविषयी विचार मांडले आहेत. यावरून महात्मा फुले यांचे विचार किती उच्चकोटीचे होते या विषयी कल्पना येते.

निष्कर्ष :

1. शेती करणारा वर्ग हा तत्कालीन बुरसटलेल्या विचारांनी देशोधडीस गेला आहे.
2. शेतकऱ्यांच्या अन्यायाविरुद्ध बंड करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय समाजसुधारक होते.
3. महात्मा फुले यांनी शेती सुधारणेविषयी ज्या उपाययोजना सांगितल्या आहेत त्या आजही उपयोगी येतात.
4. शासनकर्ती जमात आजही शेतीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात नाही.
5. शेती सुधारणेबरोबरच शेतकऱ्यांचे वैयक्तिक जीवन सुधारले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

1.गंगाधर बनबरे (2006) 'शेतकऱ्यांचा असूड' ( सू संपा) जिजाई प्रकाशन, जिजापूर पुणे.
2. कीर धनंजय (2005) 'महात्मा जोतिराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण.
3. हरी नरके (2006) 'महात्मा फुले शोधा च्या नव्या वाटा' प्रधानसचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

SIDDHI PUBLICATION

# सिद्धी प्रकाशन

श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.

पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067




## OUR SERVICES

- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM BHARAT INTERFACE FOR MONEY 9623979067

SIDDHI Siddhi Prakashan Nanded

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal**

Website : www.wiidrj.com

C/o. R.G. Umbarkar, H.No. 624, Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)

Email : umbarkar.rajesh@yahoo.com
shrishprakashan2009@gmail.com

Mob : +91-9623979067

ISSN 2454-7905

9 772454 790004